## जुळ्या शहरासह ग्रामीण भागात चोरीचा सुळसुळाट

### एकाच रात्री चार ठिकाणी घरफोड्या

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि.12)**– अचलपूर शहर आणि परिसरात चोरीच्या घटनांना वेग आला असून, एकाच रात्री चार वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नारायणपूर रोड देवमाळी, अयोध्या रेसिडेन्सी, विदर्भ मिल परिसर आणि सेतूत बाग भागात अज्ञात चोरट्यांनी मंदिरं, व्यावसायिक आस्थापनं आणि घरे यांना लक्ष्य केल्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आला आहे. माहितीनुसार, नारायणपूर रोडवरील देवमाळी परिसरात प्रशांत रमेश येवले यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी 25 ग्रॅम सोन्याचे दागिने आणि 70,000 रोख रक्कम चोरून नेली. तसेच एंजिल फिलीप मोहोड यांच्या घरातून 30 ग्रॅम सोन्याचे दागिने आणि 7-8 हजार रोख रक्कम लंपास केली. अयोध्या रेसिडेन्सीमधील एका घरात घुसून चोरट्यांनी मौल्यवान वस्तू चोरल्या. सेतूत बाग मंदिरातील दानपेटी फोडण्यात आली, तर अचलपूर येथील जगदंबा देवी संस्थान मंदिरातून देवीचा चांदीचा मुकुट चोरट्यांनी पळविला. शहरात सुरू असलेल्या सलग चोरीच्या घटनांमुळे पोलिस प्रशासनाच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी रात्री सतर्क राहावे व कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देशभक्तीच्या लाटेत सामील झाले हजारो नागरिक

### अमरावतीत 'हर घर तिरंगा' अंतर्गत भव्य तिरंगा रॅली | नेहरू मैदान ते पोलिस कवायत मैदान देशप्रेमाचा जल्लोष

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.12)** – अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत आज दुपारी नेहरू मैदानातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. हिरवा झेंडा दाखवून रॅलीला प्रारंभ झाला व पोलिस कवायत मैदानात रॅलीचे समापन झाले.

रॅलीत हजारो नागरिक, महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, व्यापारी, शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था व विविध संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शहरातील रस्त्यांवर देशभक्तीच्या घोषणांनी वातावरण दुमदुमले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली, तर रॅलीच्या शेवटी तिरंग्याचे बलून आकाशात सोडण्यात आले. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी तिरंगा केवळ ध्वज नाही, तो आपल्या अभिमान, एकते व निष्ठेचे प्रतीक आहे असे सांगून 15 ऑगस्टपर्यंत प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्याचे आवाहन केले. रॅलीच्या आयोजनात पोलीस विभाग, शालेय संस्था व महानगरपालिकेच्या विविध विभागांचे विशेष सहकार्य लाभले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त



शिल्पा नाईक, पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, उपअभियंता नितीन बोबडे, प्रमोद इंगोले, बाजार व परवाना विभागाचे उदय चव्हाण, अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, पशुविभाग, शिक्षण विभाग आणि बाजार व परवाना विभागाचे सर्व



कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले. या सर्वांनी रॅलीच्या नियोजना पासून अंमलबजावणी पर्यंत मेहनत घेतली.







## व्यापाऱ्याला जबरदस्तीने गाडीत बसविण्याचा प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.12)** – इर्विन चौकातून आपल्या दुचाकीवरून घरी जात असलेल्या 74 वर्षीय व्यावसायिकाला अज्ञात चार जणांनी अडवून जबरदस्तीने गाडीत बसविण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांच्या हालचाली लक्षात येताच आरोपी पसार झाले. या दरम्यान एका आरोपीने वृद्ध व्यापाऱ्याच्या खिशातून 700 रुपये रोख रक्कम चोरली. ही घटना 10 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजता आयएमए हॉल ते डागा सफायर बिल्डिंग मार्गावर घडली.

कांता नगर येथील हरिश शंकरलाल खंडेलवाल (वय 74) यांनी गाडगेनगर पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, 10 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजता ते इर्विन चौकातून घरी जात होते. त्यावेळी दोन दुचाकींवरून आलेल्या चार युवकांनी त्यांच्या दुचाकीला धडक देत रस्त्याच्या कडेला पाडले. त्यानंतर एकाने त्यांचा मार्ग अडवून इतरांना सांगितले की, यांना आपल्या गाडीत बसवा. मात्र खंडेलवाल यांनी आपली दुचाकी घट्ट पकडून ठेवत मदतीसाठी आरडाओरडा केला. तेव्हा रस्त्यावरून एक नागरिक येताना दिसल्याने चारही आरोपी तेथून पळून गेले. यावेळी एका आरोपीने त्यांच्या खिशातून 700 रोख काढून नेले. खंडेलवाल यांनी तिघांच्या चेहऱ्यांचा नीट पाहिला असून, आरोपी समोर आल्यास ओळख पटेल, असे सांगितले आहे. चौथा आरोपी चेहरा झाकून होता. गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात चार आरोपींवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, लवकरच आरोपींना अटक केली जाईल, असे गाडगेनगर पोलीस ठाण्याचे अतुल वर यांनी सांगितले

# समाजकल्याण कार्यालयातील लाचखोरी उघड्यावर

### डाटा एन्ट्री ऑपरेटर लाच घेताना रंगेहात पकडले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.12)**– समाजकल्याण कार्यालयातील डाटा एन्ट्री ऑपरेटर यश संतोष सोनुने (वय 23, रा. चंदननगर, आकोली रोड, अमरावती) याला अँन्टी करप्शन ब्युरो (एसीबी) अमरावतीने 18,000 रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले.

तक्रारदार हे शिक्षण घेत असून, त्यांना स्वाधार योजनेअंतर्गत 46,500 रुपयांचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) समाजकल्याण कार्यालयाकडून मिळाला होता. मात्र, आरोपी सोनुने यांनी



तक्रारदारास फोनवर संपर्क साधून, 'तुमच्या बँक खात्यात अडचण असल्याने पैसे अडले आहेत, ते क्लीअर करून पूर्ण रक्कम मिळवून देतो, पण त्यातील अर्धी रक्कम मला द्यावी लागेल,' अशी मागणी केली. यानंतर 16 जुलै रोजी पुन्हा फोन करून, 'तुमच्या खात्यात 46,500 रुपये आले आहेत, त्यातील निम्मे म्हणजे 23,000 रुपये द्या,' असा दबाव टाकला. चर्चेनंतर 18,000 रुपये लाच स्वीकारण्याचे ठरले. 12 ऑगस्ट रोजी सायं. 5 वाजताच्या दरम्यान न्यू आझाद गणेश मंडळ परिसरासमोर आरोपी सोनुने यांनी तक्रारदाराकडून पंचासमक्ष 18,000 रुपये स्विकारले. त्यानंतर त्याला तत्काळ ताब्यात घेण्यात आले. आरोपीविरुद्ध सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक सुनिल किनगे, मंगेश मोहोड आणि पथकातील पोलीस कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली.

## सिटीलॅण्ड परिसरात घातक शस्त्रांसह तीन जण अटकेत



### गुन्हे शाखा युनिट-1 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.12)** – शहरातील सिटीलॅण्ड परिसरात व्यापाऱ्यांची लूट करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या तिन्ही परप्रांतीयांना घातक शस्त्रांसह गुन्हे शाखा युनिट-01 च्या पोलिसांनी ताब्यात घेतले. अब्दुल फारुख गाझी सुन्नत अली गाझी (27), अब्दुल कलाम गाझी सुन्नत अली गाझी (37) आणि अब्दुल दईयान गाझी सुन्नत अली गाझी (22, तिन्ही रा. नेबु खली, गाझीपारा, फुलमतंच, ता. बासंती, जि. दक्षिण, चोविस परगणा, राज्य पश्चिम बंगाल, ह.मु. खाटीकपुरा, जुनीवस्ती, बडनेरा) या कारवाईत तलवार, चाकू आणि लोखंडी रॉड असा एकूण 1,200 रुपयांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी अमरावती आयुक्तालय हद्दीत अवैध शस्त्रे बाळगणारे आणि गंभीर गुन्ह्यांचे नियोजन करणाऱ्यांविरोधात प्रभावी कारवाईचे आदेश दिले होते. 11 ऑगस्ट रोजी रात्री गुप्त माहितीवरून गुन्हे शाखेच्या पथकाने सिटीलॅण्ड परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या तिन्ही संशयितांना पकडले. अंगझडतीत एक धारदार तलवार, फोल्डिंग चायना चाकू आणि दोन लोखंडी रॉड मिळाले. चौकशीत आरोपी हे पश्चिम बंगालमधील अब्दुल फारुख गाझी (27), अब्दुल कलाम गाझी (37) आणि अब्दुल दईयान गाझी (22) असून, सध्या बडनेरा येथे वास्तव्यास असल्याचे स्पष्ट झाले. व्यापारी संकुलातील दुकानदारांना परतीच्या वेळी शस्त्राचा धाक दाखवून लूट करण्याचा त्यांचा बेत असल्याचे उघड झाले. तिन्ही आरोपींवर नांदगावपेठ पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस उपायुक्त रमेश धुमाळ, गणेश शिंदे, शाम घूगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, इम्रान नाईकवडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक युसूफ सौदागर, पोलिस हवालदार फिरोज खान, सतीष देशमूख, मंगेश लोखंडे, सचिन बहाळे, प्रशांत मोहोड, नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, रंजित गावंडे, रुपेश काळे, नरेश मोहरिल, अलिमोद्दीन खतिब, किशांर खेंगरे, अशोक खंगार आणि गुन्हे शाखा युनिट-1 च्या पथकाने केली.

## भजनी मंडळाच्या वेशात पोलिसांची जुगार अड्डयावर धाड

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.12)**– शिरखेड पोलिसांनी धामणगाव येथे एका घरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर कौशल्यपूर्ण कारवाई करत एकूण 1. 54, 950 किमतीचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, पोलिसांनी या धाडीसाठी भजनी मंडळाचा वेश परिधान करून गावात प्रवेश केला. ही कारवाई 11 ऑगस्ट रोजी रात्री 10 वाजता करण्यात आली. शिरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार सचिन लुले यांना धामणगाव येथे एका बंद घरात दीर्घकाळापासून जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. मात्र, जुगारी गावाच्या वेशीवर खबरे ठेवत असल्याने पोलिस गावाजवळ आले की त्यांना सतर्क केले जात होते, त्यामुळे थेट कारवाई करणे कठीण झाले होते. 11 ऑगस्ट रोजी रात्री पुन्हा जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या आदेशानुसार ठाणेदार लुळे यांनी एक युक्ती आखली. पथकाने भजनी मंडळाचा वेश धारण करून पायी गावात प्रवेश केला. संशय न येता पोलिस थेट जुगार अड्डयावर पोहोचले आणि तेथे चालू असलेल्या पत्त्यांच्या खेळावर धाड टाकली. या कारवाईत 13 जुगारी रंगेहाथ पकडले गेले. घटनास्थळ वरून 7 अँड्रॉईड मोबाईल, 1 साधा मोबाईल, 1 मोटारसायकल, जुगार साहित्य आणि रोकड असा एकूण 1. 54, 950 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम 4 आणि 5 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये रुपेश विनायकराव गावंडे (25), संतोष सदाशिवराव गावंडे (35), मोहन राजू बरडे (30), विक्की गजानन कनेर (22), रविंद्र मधुकर आकोलकर (41), योगेश वासुदेवराव झगडे (30), देवेंद्र वासुदेवराव मानकर (25), रुपेश सुरेशराव ढाकुलकर (30), विजय पुंडलिकराव भुजाडे (38), मनोज सुधाकरराव वैराळे (39), विनोद रमेशराव वैराळे (39), सुनिल भाऊराव सुंदरकर (60), प्रज्वल विलासराव अमृते (23), (सर्व रा. धामणगाव काटसुर, ता. मोर्शी, जि. अमरावती) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लुळे यांच्या नेतृत्वात पार पडली. पथकात पोलिस उपनिरीक्षक धुर्वे, पोलिस हवालदार सचिन भाकरे, निस्ताने, वैभव घोगरे, अमित राऊत, मथुर कापडे आणि धीरज डोंगरे यांचा समावेश होता.

## शॉक लागून 16 वर्षीय मुलीचा मृत्यू

**चांदूर रेल्वे** – पाण्याची मोटार सुरू करीत असतांना करंट लागून एका 16 वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना 12 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजताच्या दरम्यान चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड गावात घडली. साक्षी निळकंठ मानकर (वय 16) असे मृतक मुलीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, सकाळी पाण्याची मोटर सुरू करण्यासाठी साक्षी मानकर ही मोटरची पीन प्लगमध्ये लावत असतांना त्याचा करंट लागला. यानंतर जखमी साक्षी ला प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले व तेथून चांदूर रेल्वेच्या ग्रामीण रुग्णालयात रेफर करण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच साक्षी चा मृत्यू झाला. साक्षी ही घुईखेड गावातील बेंडोजी बाबा विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी होती. तिला आई-वडील व एक लहान भाऊ आहे.

## पवन नगरमध्ये 2 लाख 56 हजारांची चोरी

**अमरावती** – बडनेरातील पवन नगर, नवी बस्ती येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कार, दोन मोबाईल व रोकड असा एकूण 2 लाख 56 हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना 8 ते 11 ऑगस्टदरम्यान घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, संजय माणिकराव कोहाडे (वय 59) हे 8 ऑगस्ट रोजी कुटुंबासह पुण्यात मुलाला भेटण्यासाठी गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी बंद घरात प्रवेश करून अंगणातील चारचाकी वाहन, लोखंडी आलमारीतील 1 हजार रुपये रोकड, तसेच दोन मोबाईल असा ऐवज चोरून नेला. 11 ऑगस्टच्या सकाळी शेजाऱ्याने घरफोडीची माहिती दिल्यानंतर संजय कोहाडे यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## भावाला किडनी दान करुन बहिणीने दिलं जीवनदान

### वरूडच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांच्या बहिणीचा अमूल्य त्याग

### रक्षाबंधनाला भावनिक उंची

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,(दि.12)** – रक्षाबंधन हा फक्त राखीच्या धाग्याचा सण नाही, तर प्रेम, निष्ठा आणि बलिदानाचा अनमोल धागा आहे. यंदाच्या रक्षाबंधनात हा भावार्थ प्रत्यक्षात उतरला आहे. अमरावतीतील शीतल दिनेश वाळके यांनी आपल्या भावाला, वरूडचे तत्कालीन मुख्याधिकारी प्रवीण मानकर यांना किडनी दान करून जीवनदान दिले. त्यांच्या या त्यागमय कृतीमुळे रक्षाबंधनाचा उत्सव भावनिक अर्थाने अधिक साजरा झाला.

काही महिन्यांपूर्वी प्रवीण मानकर यांना मूत्रपिंडाचा गंभीर आजार झाला. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या दोन्ही किडण्या पूर्णपणे निकामी



झाल्याचे समोर आले. डॉक्टरांनी तातडीने किडनी प्रत्यारोपण करण्याची सूचना दिली. पत्नीने दान करण्याची तयारी दर्शवली, परंतु वैद्यकीय निकषांत त्या पात्र ठरल्या नाहीत. या अत्यंत कठीण क्षणी, प्रवीण यांची एकुलती एक लहान बहीण शीतल यांनी पुढे येत रक्तगट व इतर तपासण्या करून घेतल्या. सर्व तपासण्या यशस्वी झाल्यानंतर त्यांनी नि:संकोच भावाला किडनी दान करण्याचा निर्णय घेतला.

15 मे 2025 रोजी मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ही शस्त्रक्रिया पार पडली आणि ती पूर्णपणे यशस्वी ठरली. आज प्रवीण मानकर पुन्हा आरोग्यपूर्ण जीवनाकडे वाटचाल करत आहेत. शीतल वाळके यांच्या या नि:स्वार्थी निर्णयाने भावंडांच्या नात्याचा 'संरक्षण आणि प्रेम' हा संदेश नव्या उंचीवर पोहोचवला आहे.

राखीच्या धाग्याने जोडलेले नाते आता रक्ताच्या नात्यापेक्षाही गहिरं बनलं आहे. बहीण फक्त भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करत नाही, तर स्वत:चा अविभाज्य अवयव देऊन त्याला नवा श्वास देते, हे या घटनेतून अधोरेखित झाले. या त्यागाची दखल घेत स्थानिक समाजघटकांनी शीतल वाळके यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून, त्यांना 'खऱ्या अर्थाने राखी बहिण'असे संबोधले जात आहे. ही घटना भावंडांच्या नात्याची ताकद, निस्वार्थी प्रेम आणि बलिदानाची जिवंत साक्ष ठरली आहे.

# पालकमंत्र्यांच्या पब भेटीने खळबळ

### '365' दिवस अवैध धंदे चालणाऱ्या हॉटेलमधील एंट्री ने नैतिकतेवर प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.12)**– शहरातील राजकीय वातावरणात खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. राज्याचे महसूल व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शहरातील 'पब अँड बार'मध्ये गेल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, या घटनेने संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पालकमंत्री अमरावती दौऱ्यावर असताना थेट या पबमध्ये



पोहोचले. यावेळी आमदार रवी राणा उपस्थित होते. व्हायरल व्हिडिओमध्ये हॉटेलबाहेर मंत्र्यांचा ताफा दिसतो आहे. या पबविषयी काही दिवसांपासून शहरात चर्चा सुरू होती. स्थानिक रहिवासी व सामाजिक संघटनांच्या मते, येथे तरुण-तरुणींचा 'नंगा नाच' व अश्लील वर्तन होत असल्याचे आरोप आहेत. यावरून पोलिसांकडून धाडसत्रही सुरू आहे. अशा वादग्रस्त ठिकाणी राज्याचे पालकमंत्री गेल्याने अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. युवक काँग्रेसने सकाळीच या घटनेचा निषेध नोंदवला, तर सामान्य नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींच्या अशा वर्तनामुळे वादग्रस्त ठिकाणांना अप्रत्यक्ष मान्यता मिळाल्याचा आरोप होत आहे. या घटनेमुळे राजकीय नैतिकतेवर प्रश्न निर्माण झाला असून, भाजप व सरकार यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हा जनतेशी विश्वासघात

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अमरावती शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांनी म्हटले की, शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याऐवजी पालकमंत्री त्यांना भेट देत असतील, तर हा जनतेशी विश्वासघात आहे. 'श्री सिक्सटी फाईव्ह'सह सर्व अवैध ठिकाणांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा 'जवाब द्या' आंदोलन उभारू.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# चिखलदऱ्यात जीप्सीवाल्यांची मुजोरी

**पर्यटकांची लूट, प्रशासनाचे दुर्लक्ष**

**पंचबोल, भीमकुंड पॉइंटवर लूटमार**

**पार्किंग आणि व्यवस्थापनाचा अभाव**





**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, ( दि. 12 )–** विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यात पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी असते. नागपूर, बुलढाणा, मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून लोक येथे निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी येतात. पंचबोल, भीमकुंड यांसारखे लोकप्रिय पॉइंट्स पर्यटकांच्या यादीत हमखास असतात. मात्र, अलीकडे येथे जीप्सीवाल्यांची मनमानी आणि पर्यटकांना लुटण्याचे प्रकार वाढले असून त्यामुळे चिखलदऱ्याची प्रतिमा मलिन होत आहे.

पंचबोल पॉइंटवर अलीकडेच एका जीप्सी चालकाचा पर्यटकासोबत मारामारीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. पर्यटकांच्या मते, केवळ एक किलोमीटर अंतरासाठी हे चालक दोन हजार रुपयांपर्यंत दर वसुलतात. शनिवार-रविवारी गर्दी असल्याने याहून जादा भाडे आकारले जाते, इतर दिवशीही पर्यटकांच्या स्वत:च्या गाड्यांना त्या पॉइंटवर जाऊ दिले जात नाही. याशिवाय, पार्किंगची कोणतीही अधिकृत व्यवस्था नसल्याने, स्थानिकांनी उभारलेल्या तात्पुरत्या स्टॉलच्या मागे छोटीशी जागा देऊन प्रति गाडी शंभर ते दीडशे रुपये पार्किंग शुल्क आकारले जाते. या प्रकारामुळे पर्यटकांना मोठा आर्थिक फटका बसतो आहे. स्थानिक अर्थव्यवस्था प्रामुख्याने पर्यटनावर अवलंबून असली, तरी अशा लूटमार आणि अव्यवस्थेमुळे चिखलदऱ्याकडे पर्यटकांचा ओढा कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पर्यटकांनी वारंवार तक्रारी केल्या असल्या तरी, प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

### जिप्सी सफारीचा हेतू आणि वास्तव

जिप्सी सफारी सुरू करताना वनविभागाने हा उपक्रम मेळघाटातील आदिवासींच्या आर्थिक उन्नतीचा एक नवा अध्याय ठरेल, असे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात 99 टक्के जीप्सी गैरआदिवासींच्या मालकीच्या आहेत, ही बाब चर्चेचा विषय ठरली आहे. हे चालक पर्यटकांशी उर्मटपणे वागतात, वेगवान आणि धोकादायक वाहन चालवितात ज्यामूळे अपघातांची भीती निर्माण होते, तसेच त्यांच्या वाहनांमुळे इतर गाड्यांना पार्किंगची सोय मिळत नाही. या परिस्थितीवर नियंत्रण न मिळाल्यास आणि प्रशासनाने नियमबद्ध व्यवस्था लागू न केल्यास, भविष्यात चिखलदऱ्याच्या पर्यटनावर गंभीर परिणाम होईल, यात शंका नाही. पर्यटकांनीही सुरक्षित आणि सुसंस्कृत पर्यटनासाठी आवाज उठवण्याची गरज असल्याचे पर्यटक अर्चना सवई यांनी म्हटले आहे.

# शशिकांत मंगळे यांची दिल्लीतील स्वातंत्र्यदिन सोहळ्यास उपस्थिती

## अमरावती जिल्ह्याचा गौरव



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.12 ) –** भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यासाठी देशभरातून निवडक सरपंचांना दिल्ली येथे मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित केले जाते. यावर्षी महाराष्ट्रातून निवड झालेल्या 15 सरपंचांपैकी अमरावती जिल्ह्यातील कसबे गव्हाण ग्रामपंचायतीचे सरपंच शशिकांत मंगळे यांचीही निवड झाली आहे. हा जिल्ह्यासाठी मोठा सन्मान मानला जात असून, ते 13 ऑगस्ट रोजी दिल्लीला रवाना होऊन 14 ऑगस्ट रोजी भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाच्या विविध कार्यक्रमात सहभागी होतील. 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

1989 पासून ग्रामविकासासाठी कार्यरत असलेल्या मंगळे यांनी महात्मा गांधी तंटामुक्त गाव, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, आर. आर. पाटील सुंदर ग्राम स्पर्धा अशा उपक्रमांत गावाला अनेक पारितोषिके मिळवून दिली आहेत. यात जिल्हास्तरीय 50 लाखांचा सुंदर ग्राम पुरस्कार, स्वच्छता अभियानातील 50 हजारांचा पुरस्कार, तसेच तंटामुक्त अभियानात 5 लाखांचा पुरस्कार यांचा समावेश आहे. या निधीतून भूमिगत गटार, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, सुसज्ज अंगणवाडी, डिजिटल शाळा, वाचनालय, व्यायामशाळा आदी सुविधा उभारल्या.

केंद्र शासनाच्या हर घर जल, प्रधानमंत्री आवास, जन आरोग्य, मातृ वंदन, विश्वकर्मा, सूर्य घर मुक्ती यांसारख्या योजनांचा यशस्वी अंमल करून गावाचा सर्वांगीण विकास साधण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. या विशेष संधीबद्दल मंगळे यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी, गटविकास अधिकारी आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले आहेत.



# बेनोडा शहीद येथे भरती मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

**टाटा मोटर्सची सुवर्णसंधीचा लाभ**

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.12 )–** स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी रोजगाराचा सुवर्णद्वार उघडत टाटा मोटर्स कंपनीच्या भरती मुलाखती बेनोडा शहीद येथील विश्रामगृहात घेण्यात आल्या. इच्छुक उमेदवारांच्या उत्स्फूर्त गर्दीमुळे परिसर रोजगारमय वातावरणाने गजबजला. कंपनीचे एच. आर. अनिल सावरकर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांची निवड प्रक्रिया पार पाडली. यावेळी पत्रकार विलास पाटील यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. सरपंच रजनी कुबडे, अशोक कुबडे, माजी तालुकाध्यक्ष मनोज गेडाम यांनी सदिच्छा भेट देत उपक्रमाचे कौतुक केले. तसेच यशवंत खडसे, विजय बांबल, चेतन पोटोडे, बाल्या गोहाड यांची उपस्थिती होती. मुलाखतीदरम्यान उमेदवारांच्या चेहऱ्यावर नोकरीची संधी मिळण्याचा उत्साह व आत्मविश्वास स्पष्टपणे जाणवत होता. हा उपक्रम ग्रामीण भागातील तरुणांच्या रोजगार संधींना चालना देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# मेळघाटातील आरोग्यसेवेचा प्रश्न अजुनही अनुत्तरीत

## चुरणी उपजिल्हा रुग्णालयाची तातडीची गरज




**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि.12 )–** मेळघाट परिसरात सिकलसेल, ॲनेमिया यांसारखे गंभीर आजार मोठ्या प्रमाणात आढळतात. या आजारांवर प्रभावी व तातडीने उपचार मिळण्यासाठी अत्याधुनिक, सुसज्ज रुग्णालयाची आवश्यकता दीर्घकाळापासून जाणवत आहे. विशेषत: आपत्कालीन शस्त्रक्रिया, मातृत्व सेवा, नवजात बालकांची व गरोदर मातांची काळजी, तसेच हृदयविकार, डायलिसिस यांसारख्या सुविधांसाठी रुग्णांना आजही शेकडो किलोमीटर दूर जावे लागते.

सध्या चुरणी ग्रामीण रुग्णालयात सुमारे 30 खाटांची क्षमता असून रोज अनेक रुग्णांची तपासणी केली जाते. मात्र, उपकरणांचा अभाव, रुग्णवाहिकांची कमतरता, रक्तबँकेचा अभाव आणि रात्रीच्या वेळी आपत्कालीन सेवांची अनुपलब्धता यामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. स्थानिकांचा ठाम आग्रह आहे की चुरणी ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून ते उपजिल्हा रुग्णालय करण्यात यावे. यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, आवश्यक वैद्यकीय स्टाफची भरती, आणि अत्याधुनिक उपकरणांची उपलब्धता सुनिश्चित होईल. अशा सुधारणा झाल्यास मेळघाटातील ग्रामीण व आदिवासी रुग्णांना त्यांच्या गावाजवळच योग्य आणि तातडीची आरोग्यसेवा मिळेल. चुरणी येथे उपजिल्हा रुग्णालय झाल्यास या भागातील 40 ते 50

चुरणी ग्रामीण रुग्णालय हे अतिशय दुर्गम व आदिवासी भागात आहे. येथे दररोज मोठ्या संख्येने रुग्ण येतात, परंतु आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. वरिष्ठ अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी या रुग्णालयाकडे विशेष लक्ष देऊन ते उपजिल्हा रुग्णालयात रूपांतरित करावे.

**रुपेश भक्ते,**
**नागरिक, चुरणी.**

# ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा गुरूवारी दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे गुरूवार, दि. 14 ऑगस्ट रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. दौऱ्यानुसार, गुरूवार, दि. 14 ऑगस्ट रोजी 3 वाजता विश्रामगृह, तिवसा येथे आगमन व तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्यासमवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवड यासंबंधी चर्चा करतील. दुपारी 3.30 वाजता आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियास भेट देतील. दुपारी 4.30 वाजता प्रस्तावित शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवडीच्या ठिकाणास भेट व पाहणी करतील. सायंकाळी 5.30 वाजता सोईनुसार काटोलकडे प्रयाण करतील.

# ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी वरुड येथे भव्य कर्ज मेळावा

## 15 महिला बचत गटांना 1 कोटी रुपयांचे कर्ज वाटप



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.12 ) –** ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीला चालना देण्यासाठी उमेद ङ्क महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव अभियान' अंतर्गत भव्य बँक कर्ज मेळावा आयोजित करण्यात आला.

या मेळाव्यात तालुक्यातील 15 महिला बचत गटांना एकूण 1 कोटी रुपयांचे बँक कर्ज वितरित करण्यात आले. या निधीमुळे ग्रामीण महिला उद्योजिकांना व्यवसाय विस्तार, उत्पादन वाढ आणि नवीन रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.मेळाव्यास गट विकास अधिकारी खुशालजी पिल्लारे, एसबीआय वरुड शाखा व्यवस्थापक मनीष पाठक, निखिल पराडकर, तालुका अभियान व्यवस्थापक प्रशांत गजभिये, तालुका व्यवस्थापक संजीव साबणकर, प्रभाग समन्वयक कविता पाटणकर, प्रफुल गवई, अंकित बहुरूपी, प्रीतम निकम (बँक सखी) व जया हरले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

उपक्रमात सीआरपींनी उत्साही सहभाग नोंदवत महिला गटांना आर्थिक सल्ला व प्रोत्साहन दिले. लाभार्थींनी कर्जाचा उपयोग उद्योगवृद्धी, नवीन व्यवसाय सुरू करणे व रोजगारनिर्मिती यासाठी करण्याचा संकल्प व्यक्त केला. शेवटी आयोजकांनी सर्व महिला बचत गटांचे अभिनंदन करत भविष्यातही अशा उपक्रमांची मालिका राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कृत्रिम टाक्यांमध्ये पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन व्हावे!

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा ( एमपीसीबी ) चा भर





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** गणेश मुर्ती विसर्जनासाठी उभारण्यात येणाऱ्या कृत्रिम टाक्यांमध्ये पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन व्हावे, यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) भर दिला आहे.

वसुंधरा फाउंडेशनने 6 ऑगस्ट 2025 रोजी एमपीसीबीच्या अमरावती प्रादेशिक कार्यालयाला दिलेल्या निवेदनाच्या आधारे, मंडळाने अमरावती महानगरपालिकेला छत्री तलावाजवळ तयार होणाऱ्या कृत्रिम टाक्यांबाबत विशेष सूचना करण्याची शिफारस केली आहे. संस्थेचे अध्यक्ष गणेश अनासाने व भूवैज्ञानिक किशोर देशमुख यांनी सांगितले की, टाकी जलाशयाच्या जवळ असून त्यात जलरोधक अस्तर (प्लास्टिक शीट/जिओ-मेंब्रेन) नसल्यामुळे रासायनिक व अपघटनीय घटक झिरपून मुख्य तलावात मिसळण्याचा धोका आहे.

### जलप्रदूषणाचा धोका वाढतोय

मर्यादित जागेत मोठ्या प्रमाणात मूर्त्या विसर्जित केल्याने रेजिन, रंग, माती, फुले इत्यादी प्रदूषक मोठ्या प्रमाणात जमा होतात. टाक्या जलाशय, विहीर किंवा तलावांच्या जवळ असल्यास झिरपणामुळे क्रॉस-कंटॅमिनेशनचा धोका वाढतो.

### अश्या आहेत मागण्या

कृत्रिम टाक्यांच्या बांधकामासाठी वैज्ञानिक व सुरक्षित पद्धतीने पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, अस्थायी टाक्यांमध्ये जलरोधक अस्तर व लीचेट संकलन व्यवस्था अनिवार्य करावी, विसर्जनानंतर कचरा संकलन व विल्हेवाटीसाठी ठोस यंत्रणा असावी, पर्यावरणपूरक मूर्ती व विसर्जन पद्धतीबाबत जनजागृती करावी.

### महानगरपालिकेला बजावले पत्र

एमपीसीबीचे प्रादेशिक अधिकारी एस. डी. पाटील यांनी 11 ऑगस्ट 2025 रोजी महानगरपालिकेला पत्र पाठवून मुंबई उच्च न्यायालयाचा 24 जुलै 2025 चा आदेश व राज्य सरकारच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाचा 1 ऑगस्ट 2025 चा शासन निर्णय काटेकोरपणे अंमलात आणण्यावर भर दिला आहे. गणेश विसर्जनाशी संबंधित सर्व पर्यावरणीय तत्त्वांचे पालन करून जलप्रदूषण रोखण्याचे व पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे आवाहन वसुंधरा फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश अनासाने यांनी केले आहे.

# समर्पण सांझाग्राममध्ये राखी पौर्णिमेचा स्नेहबंध सोहळा





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** मालधुर, मोझरी येथील समर्पण सांझाग्राम मध्ये दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी राखी पौर्णिमेचा मंगलमय सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्नेहबंध दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात समाजातील विविध स्तरांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात समर्पण च्या वतीने आयोजित स्नेहभोजनाने झाली. उपस्थित पाहुण्यांनी या स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेत, एकमेकांशी मनमोकळा संवाद साधत आपुलकीचे बंध अधिक घट्ट केले. त्यानंतर प्रांगणात रंगारंग सांस्कृतिक व संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या भावगीतांनी, गझलांनी आणि वाद्यवृंदाच्या सुरांनी वातावरण भारून गेले. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे कौतुक केले. या सोहळ्यास अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

समाजसेवा, शिक्षण, कला आणि उद्योगक्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी कार्यक्रमाला हजेरी लावून समर्पण सांझाग्राम च्या या उपक्रमाचे कौतुक केले. राखी पौर्णिमेच्या निमित्ताने भगिनींनी भावंडांना राखी बांधून, मिठाई वाटून स्नेहबंध दृढ केले.या अनोख्या उपक्रमातून राखी पौर्णिमेचा पारंपरिक सण साजरा करण्यासोबतच समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि आपुलकीचा संदेश देण्यात आला. सहभागींसाठी हा सोहळा एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

समर्पण च्या या प्रयत्नाने केवळ राखीच्या धाग्यांचे सांस्कृतिक महत्त्वच अधोरेखित झाले नाही, तर माणुसकीच्या नात्यांतील गोडवाही अधिक दृढ झाला.

